श्रीम.सुनिता बाबुराव सावंत, आरोग्य सहाय्यक महिला
प्राथमिक आरोग्य केंद्र आढळगाव, ता.श्रीगोंदा
यांची स्वेच्छा सेवानिवृती मंजूर करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
आरोग्य विभाग
जा.क्र.आरोग्य/कार्या२/आस्था-५/१३३/२०२५
अहिल्यानगर दि. २४/०३ /२०२५

**संदर्भ**:- १.वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र आढळगाव यांचे पत्र जा.क्र.वशि/आस्था/४६/२०२५ दि.१५/०१/२०२५
२.वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र आढळगाव यांचे पत्र जा.क्र.वशि/आस्था/९४/२०२५ दि.१०/०३/२०२५
३.महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ नियम ६५
४.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे कडील अधिकार प्रदान आदेश क्रं साप्रवि१/रवका/६९६/१६ दि.१७/०६/२०१६

ज्याअर्थी श्रीम.सुनिता बाबुराव सावंत, आरोग्य सहाय्यक महिला प्राथमिक आरोग्य केंद्र आढळगाव, ता.श्रीगोंदा यांनी दि.०१/०१/२०२५ च्या अर्जानुसार संदर्भ क्रं.१ अन्वये स्वेच्छा सेवा निवृत्ती करणेबाबत विनंती केलेली आहे. श्रीम.सावंत, आरोग्य सहाय्यक महिला,प्राथमिक आरोग्य केंद्र आढळगाव,ता.श्रीगोंदा यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसलेबाबत संबंधीत कार्यालय प्रमुखांनी प्रमाणीत केलेले आहे. परंतु भविष्यकाळात लेखा परिक्षणामध्ये अगर इतर तपासणीमध्ये त्यांचेकडेस कोणतीही वसुली निघाल्यास अशी वसुली त्यांचेवर/त्यांचे कायदेशीर वारसांवर भरणे बंधनकारक राहील. श्रीम.सुनिता बाबुराव सावंत, आरोग्य सहाय्यक महिला यांची ऐच्छिक सेवानिवृत्ती मंजुरी करणेकामी नियुक्ती प्राधिकारी हे सक्षम प्राधिकारी आहेत.

त्याअर्थी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी संदर्भ क्रं.४ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-१ जिल्हा परिषद अहिल्यानगर, या आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम ६५ नुसार श्रीम.सुनिता बाबुराव सावंत, आरोग्य सहाय्यक महिला यांना दि. १ / ४ /२०२५ रोजी मध्यान्होत्तर पासून आरोग्य सहाय्यक महिला पदावरून स्वेच्छा सेवानिवृत्त करित आहे. तरी सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करावी. **सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक** 20250324100092 **असा आहे.**

Signed by
Shelke Rahul Ashok
Date: 24-03-2025 10:32:37
(राहुल शेळके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्रीम.सुनिता बाबुराव सावंत, आरोग्य सहाय्यक महिला
द्वारा व प्रतः- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र आढळगाव,ता.श्रीगोंदा,जिल्हा अहिल्यानगर

२/- सोबत आदेशाच्या दोन प्रती पाठविलेल्या आहेत. संबंधीतास एक प्रत बजावुन दुसऱ्या प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी. श्रीम.सुनिता बाबुराव सावंत, आरोग्य सहाय्यक महिला, यांना दि. १ / ४ /२०२५ रोजी मध्यान्होत्तर पासून स्वेच्छा सेवा निवृत्त करणे कामी जरुर ती कार्यवाही करावी.

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत - तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा
प्रत - साप्रवि१/पेन्शन

(राहुल शेळके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर